**निशाणी क्रमांक – ५२**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२</u>**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नांव – रामराव नामदेव राख,

वय – ४५ वर्षे, नेमणुक – वाहक,

अहमदपूर आगार.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एन. ए. भांगे.</u>**

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २७३ अन्वये )

**०१.** मी आरोपींना ओळखत नाही. मी फिर्यादीला ओळखत नाही. पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी अंबाजोगाई रोड, अहमदपूर येथे मशिनरीच्या दुकानात दिनांक २८.०५.२०२३ रोजी बोलवले होते. पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा १२ ते १२.३० च्या दरम्यान केला. घटनास्थळ अंधोरीकर साहेबांनी आम्हाला दाखवले. घटनास्थळ पंचनाम्यासाठी दुसरे पंच जहेरोद्दीन, अंधोरीकर साहेब व इतर काही लोक होते. त्यांनी आमच्यासमक्ष पंचनामा केला. तो मला वाचून दाखवला. आता मला घटनास्थळ पंचनामा निशाणी ५१ दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

सरतपास पुर्ण.

न्या.द.प्र.वर्ग.

**(आरोपीचा मुदतीचा अर्ज निशाणी ४९ मंजूर. सबब, उलटतपास तहकुब.)**

श्रृवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.01.03 16:22:57 +0530

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

दिनांक –०३.०१.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

अहमदपूर.

न्या.द.प्र.वर्ग.

**निशाणी क्रमांक – ५०**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नांव – जहरोद्दीन कचरू शेख,

वय – ४१वर्षे, नेमणुक – वाहक,

अहमदपूर आगार.

**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एन. ए. भांगे.**

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २७३ अन्वये )

**०१.** मी आरोपींना ओळखत नाही. मी फिर्यादीला ओळखत नाही. पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी अंबाजोगाई रोड अहमदपूर येथील गॅरेजच्या दुकानात दिनांक २८.०५.२०२३ रोजी बोलवले होते. पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा सकाळी ११ ते १२ च्या दरम्यान केला. घटनास्थळ अंधोरीकर साहेबांनी आम्हाला दाखवले. घटनास्थळ पंचनाम्यासाठी दुसरे पंच रामराव राख, अंधोरीकर साहेब व इतर काही लोक होते. त्यांनी आमच्यासमक्ष पंचनामा केला. तो मला वाचून दाखवला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.५१** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

(आरोपीचा मुदतीचा अर्ज निशाणी ४९ मंजूर. सबब, उलटतपास तहकुब.)

श्रृवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.01.03 16:23:02 +0530

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

दिनांक –०३.०१.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

अहमदपूर.